# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक, उच्च शिक्षण जळगांव विभाग जळगांव

### यांचे कार्यालय महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर, जळगांव

दुरध्वनी क्रमांक (०२५७-२२३८५१०) E-mail-jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र.ससंउशि/जविज/तासिका मानधन देयके/ २०२४-२५/

**परिपत्रक**

प्रति,

सर्व प्राचार्य,
अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी तसेच शिक्षणशास्त्र,
महाविद्यालये, जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्हा,

**विषय- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/ संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/ तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन देयके सादर करणे बाबत.**

**संदर्भ** :-१. अर्थसं-२१-२२/अशा.अनु.महा/अकृषी/लेखा-२/७७४० दिनांक. २ जुलै २०२१
२. शासननिर्णयउच्च व तंत्रशिक्षणविभागक्रं.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०५/१ मशि-३ दि. २७ मार्च २०२३
३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/ता.त./मवि-१/२०२३/३८८७ दि. २८ मार्च २०२३

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यायांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात तासिका तत्वारील अध्यापक शैक्षणीक अर्हता पूर्ण करीत आहेत म्हणजेच पीएचडी / नेट / सेट पात्र असलेल्याच अध्यापकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. अशाच अध्यापकांना संदर्भ क्र. २. नुसार शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रं. संकीर्ण २०२२/प्र.क्र. १०५/१ मशि-३ दि. २७ मार्च २०२३ मध्ये नमूद केलेल्या सुधारित तासिका मानधनाबाबत संदर्भ क्र. ०३, अन्वये संचालनालयाच्या पत्राद्वारे तासिका तत्वावर अध्यापकांना शासन निर्णयातील तरतूदी पूर्ण करीत असलेल्या प्राध्यापकांना सुधारित तासिका मानधन दि. ०१ एप्रिल- २०२३ पासून लागू करण्याबाबत आदेश निर्गमित झालेला आहे. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

उक्त बाब लक्षात घेता तासिका तत्वावरील मानधनाची देयके प्रस्तुत कार्यालयात सादर करतांना बरेच महाविद्यालय अपूर्ण प्रस्ताव या कार्यालयात सादर करतात त्यामुळे संबंधित अध्यापकांस तासिका मानधन विहित वेळेत अदायगी होत नसल्याचे निर्देशनास आलेले आहे. तासिका तत्वावरील अध्यापकांचे तासिका मानधन हे नियमानुसार, काटेकोरपणे तपासून संपूर्ण प्रस्ताव (सॉफ्ट कॉपी (Ms-Excel DVOT-SurekhMR) मध्ये तसेच हार्ड कॉपीमध्ये खालील नमूद केलेली आवश्यक त्या कागदपत्रासह संपूर्ण प्रस्तावासह माहिती सादर करावी. **तसेच (CHB) मानधनाचे प्रस्ताव दर महिन्याच्या २ तारखेपर्यंत या कार्यालयात सादर करावेत व प्रस्ताव सादर करतांना खालील नमूद कागदपत्रे सादर करावीत.**

१. प्राचार्या यांचे हमीपत्र २. सोबत जोडलेले नमुना ०१, ०२, ०३, ०४.०५ ०६ व ०७ मधिल संपूर्ण माहिती ३. प्रस्तुत कार्यालयाचे तासिका (NOC) नाहरकत प्रमाणपत्र ४. विद्यापीठ मान्यता आदेश. ५. मंजुर कार्यभार छायांकित प्रत सन २०१७ ६. अध्यापकांचे तासिका नियुक्ती आदेश व रूजु अहवाल. ७. निवड समिती अहवाल, ८. विद्यापीठाने मंजुर केलेल्या महाविद्यालयनिहाय तसेच महिना निहाय तासिका वेळापत्रक व वाटप करण्यात आलेला तासिका कार्यभार तक्ता ९. कमी अधिक तासिका मानधन अदायगी झाल्यास संबंधित अध्यापकांचे हमीपत्राची साक्षांकित प्रत, १०. तसेच दर महिन्याचे हजेरी पत्रक, इत्यादी आवश्यक असलेले कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर करावेत.

वरील सर्व अभिलेखेसह संपूर्ण प्रस्ताव प्रस्तुत कार्यालयात सादर करावेत अपूर्ण प्रस्ताव सादर करू नये तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाचे प्रस्ताव महाविद्यालयाकडे प्रलंबित राहणार नाहीत याची सर्व प्राचार्य, यांनी दक्षता घेण्यात यावी.

Signed by Ranjitsing
Krishnarao Nimbalkar
Date: 30-08-2024 17:58:33

सहसंचालक,
उच्च शिक्षण,जळगांव विभाग, जळगांव

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर</u>

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे.



Scanned with CamScanner